# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.01.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- दावोसमध्ये पहिल्याच दिवशी राज्यात गुंतवणुकीसाठी 4 लाख 99 हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार
- या करारांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
- छत्तीसगड आणि ओडिशामध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत 14 नक्षलवादी ठार

  आणि
- भारत-इंग्लंड क्रिकेट संघांदरम्यान वीस षटकांच्या मालिकेला आजपासून सुरुवात.

**दावोस**

दावोसमध्ये सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत काल पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने 4 लाख 99 हजार 321 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातून 92 हजारांपेक्षा जास्त रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. जेएसडब्ल्यू समवेत 3 लाख कोटीं रुपयांचा करार काल झाला. पोलाद, नवीनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम-आयर्न बॅटरिज, अशा विविध क्षेत्रात हा करार करण्यात आला आहे. गडचिरोलीमध्ये संरक्षण, पोलाद आणि इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रासाठीचे प्रकल्प उभारण्यासाठी कल्याणी समूहासमवेत देखील काल करार झाला. या करारांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**पीठासीन अधिकारी**

विधिमंडळाचं कामकाज सुरळीतपणे चालवण्याचा आणि सभागृहात गुणवत्तापूर्ण चर्चा घडवून आणण्याचा संकल्प काल अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेत घेण्यात आला. पाटणा इथं आयोजित 85 व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या समारोप सत्रात पाच ठराव संमत करण्यात आले.

**नक्षलवादी**
छत्तीसगड आणि ओदिशाच्या सीमेवर सुरक्षा दलांनी केलेल्या संयुक्त कारवाईत 14 नक्षलवादी ठार झाले. त्यात नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य जयराम उर्फ चलपती याचाही समावेश आहे. त्याच्यावर 1 कोटी रुपयांचं बक्षीस होतं. सुरक्षा दलांनी घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठाही जप्त केला आहे.

**शपथ**
मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी काल शपथ घेतली. मुंबईत राजभवनात झालेल्या एका समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्यायमूर्ती आलोक आराधे यांना पदाची शपथ दिली.

**प्रकाश आबिटकर**
राज्यामध्ये कर्करुग्णांचं प्रमाण वाढत असून स्तन आणि गर्भाशयमुख कर्करोगाच्या निदानासाठी राज्यात मोहीम राबवावी असे निर्देश आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काल दिले. 2025 - 26 या वर्षाच्या नियोजनासाठी मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते. क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याच्या तसंच कुष्ठरोग रुग्ण शोध मोहीमही प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**चिकुन गुनीया**
राज्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या पंधरवड्यात चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत दुपटीने वाढ झाली आहे.  पहिल्या पंधरवड्यात चिकुनगुनियाचे सर्वाधिक 20 रुग्ण अकोला महापालिकेत आढळले आहेत. हिवतापाचे सर्वाधिक 185 रुग्ण बृहन्मुंबई महापालिकेत नोंदविण्यात आले असून, त्या खालोखाल गडचिरोलीत 138 रुग्ण आढळून आले आहेत. डेंग्यूचे सर्वाधिक 44 रुग्ण बृहन्मुंबई महापालिकेत नोंदविण्यात आले आहेत. असं आरोग्य विभागाच्या अहवालातून समोर आलं आहे.

**गुलवेल बॅलन्स सिंड्रोम**
पुण्यात गुईलेंन बॅरे सिंड्रोम या नव्या विकराचे 22 संशयित रुग्ण  आढळून आले आहेत. गुईलेंन बॅरे सिंड्रोम हा एक मज्जासंस्थे संबंधीचा विकार आहे.  हा विकार दुर्मिळ असला तरीही धोकादायक नसल्याचं पुणे आरोग्य विभागानं स्पष्ट केलं आहे.  पुणे शहर आणि जिल्ह्यातील काही संशयित रुग्णांचे नमुने राष्ट्रीय प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी देण्यात आले आहेत. दरम्यान हा आजार संसर्गजन्य नसल्याचं पुणे महापालिका आरोग्य प्रमुख नीना बोराडे यांनी  म्हटलं आहे.

**देवळाली तोफखाना**
भारतीय सैन्य दलात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सामावेश होत आहे. प्रगत तंत्रज्ञान जवानांना अवगत व्हावं या दृष्टीने प्रशिक्षण देण्यास प्राधान्य दिलं जातं आहे, असं प्रतिपादन देवळालीच्या तोफखाना केंद्राचे प्रमुख

लेफ्टनंट जनरल नवनीतसिंग सरना यांनी पत्रकार परिषदेत केलं. देवळालीच्या तोफखाना प्रशिक्षण केंद्रातील “ तोपची “ या वार्षिक सरावाची सांगता काल झाली. तोफखाना दलाची शस्त्र सज्जता दर्शवण्यासाठी या सरावाचं दरवर्षी आयोजन केलं जातं. ऐकुया या विषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून... . . . .

**भारतीय तोफखाना दलातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक शस्त्र, यंत्रणा यांची प्रात्यक्षिकं या सरावात दाखवण्यात आली. युद्धभूमीवर भारतीय सैन्यदलाकडून वापरल्या जाणाऱ्या बोफोर्स, धनुष, कोरियन बनावटीची k 9, वज्र तसच इंडियन फील्ड गन या तोफानी लक्ष्यावर भेदक मारा करून भारतीय तोफखाना दलाचं सामर्थ्य दाखवलं. पिनाका रॅकेट लॉचर याचाही या सरावात समावेश होता. तसच , संपूर्ण भारतीय बनावटीची अटॅग्ज ही संपूर्ण भारतीय बनावटीची तोफदेखील या प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. या तोफेची मारक क्षमता 48 किलोमीटर आहे. तर बोफोर्स तोफेची मारक क्षमता 38 किलोमीटर इतकी आहे. मारा करण्यास सज्ज होण्यासाठी या तोफेला एक मिनिटाचा वेळ लागतो. ही तोफ स्वयंचलित असून, लक्ष्यावर अचूक मारा करते. तोफेच्या चाचण्या सिक्कीम, बलासोर आणि पोखरण या ठिकाणी झाल्या आहेत. भारतीय लष्करासाठी अटॅग्ज ही तोफदेखील अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी श्रद्धा वार्डे यांच्यासह प्रशांत जाधव पुणे.**

**नेत्रदानसंकल्प**

नेत्रदानातून अनेक दृष्टिहीनांना नवी दृष्टी मिळू शकते, त्यामुळे अधिकाधिक जणांनी नेत्रदानाचा संकल्प करावा,असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड- नॅब या संस्थेच्या 74 व्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ही संस्था छापखाना, बोलकी पुस्तकं, प्रशिक्षणं अशा उपक्रमांद्वारे अंध, तसंच दृष्टिबाधितांना आशा आणि सक्षमीकरणाची हमी देणारी आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट**

साखर उद्योगात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कारखान्यांना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीनं देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा काल संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. 2023 - 24 या वर्षाच्या गाळप हंगामासाठी आंबेगावच्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला सर्वोकृष्ट ऊस विकास पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते उद्या हे पुरस्कार वितरीत केले जातील.

**डिजिटल रेशन कार्ड**

कोल्हापूर जिल्ह्यातील तृतीयपंथी, देवदासी, एचआयव्ही बाधित 20 व्यक्तींना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते काल डिजिटल रेशन कार्ड वितरीत करण्यात आली. अशा व्यक्तींसाठी शासनाच्यावतीने

अनेक योजना राबविण्यात येतात, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी समाज कल्याण विभागाशी संपर्क साधण्याचं आवाहन येडगे यांनी यावेळी केलं.

**सदस्यत्वरद्द**
बीड जिल्ह्यातील आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातील 413 ग्रामपंचायत सदस्य आणि 13 सरपंचाचे सदस्यत्व जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी रद्द केले आहे. विहित मुदतीत  जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

**कॉंग्रेस आंदोलन**
25 जानेवारी हा दिवस मतदार दिवशी काँग्रेस पक्षातर्फे प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आंदोलन करून तिथे जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन देणार असल्याची माहिती कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी काल मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.हे सरकार जनतेसाठी नाही तर स्वतःसाठी काम करणारे असल्याचा आरोप त्यांनी केला.

**सैफ**
चाकू हल्ल्यात जखमी झालेला अभिनेता सैफ अली खान याला उपचारांनंतर रुग्णालयातून घरी सोडलं आहे. 16 जानेवारी रोजी पहाटे सैफ अली खान याच्यावर वांद्रे इथल्या राहत्या घरी चाकू हल्ला झाला होता. त्यानंतर त्याला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल केलं होतं. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून त्याच्या पाठीत घुसलेला चाकुचा तुकडा बाहेर काढला होता.

**निधन**
संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे यांच्यावर काल आळंदी इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं सोमवारी रात्री पुण्यात एका खासगी रुग्णालयात निधन झालं. कीर्तन प्रवचनातून आध्यात्मिक प्रबोधन करतानाच हजारो लोकांना व्यसनमुक्त करण्याचं सामाजिक कार्य किसन महाराज साखरे यांनी केलं. संस्कृत आणि मराठीतून एकंदर 115 ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणूनही  त्यांनी काम पाहिले आहे. अध्यात्म, वैदिक ज्ञान परंपरेचा निस्सीम साधक म्हणून गुरूवर्य डॉ. किसन महाराज साखरे यांची कार्यसाधना पुढील कित्येक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखी तेजोमय राहील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. किसन महाराज साखरे यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही किसन साखरे महाराज यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड पुरुष क्रिकेट संघादरम्यानच्या टी-20 सामना मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. पाच सामन्यांच्या मालिकेतील आजचा पहिला सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्स मैदानावर खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता सामन्याची सुरुवात होईल.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज आकाश अंशतः ढगाळ राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**